# संकरीत गो पैदास प्रकल्प

## ५८८ वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जा.क्र.संगोपैप्र/ /१६ दिनांक१४/०९/२०१६

**सुधारीत जाहिर प्रगटण**

या जाहिर प्रगटणाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या गोठयाच्या पत्री शेडवर व परिसरात वाढलेल्या फांदया वादळी वा-याने मोडून पत्र्याच्या शेडवर पडतात व शेडचे नुकसान होते. भविष्यात यामुळे होणारे नुकसान व शेडमध्ये असलेल्या जनावरांची जिवित हानी टाळण्यासाठी शेडच्या ऊंचीपसून अंदाजे पाच फुट जास्त ऊंची ठेवून यापेक्षा जास्त ऊंचीच्या फांदयाचां भाग तोडणे व विक्री जाहिर लिलावाद्वारे करावयाची आहे. यामध्ये रेन्ट्री ८५ व गुलमोहर इत्यादि ६ झाडांच्या फांदयाचा समावेश आहे. तरी इच्छूक असलेल्या जनतेनी दि. १४-०९-२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर हजर राहावे असे जाहिर प्रगटणाद्वारे कळविण्यात आलेले होते,.परंतू काही अपरिहार्य कारणामुळे सदरील लिलाव दि. २१-०९-२०१६ **रोजी सकाळी** १०.०० वाजता आयोजीत करण्यात आला आहे. तरी इच्छूक असलेल्या जनतेनी लिलावास हजर राहावे.

**जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.**

१. विक्रीस असलेल्या फांद्या प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर आल्यावर पाहवयास मिळतील.
२. लिलावात भाग घेणा-या बोली बोलणा-या व्यक्तीस प्रथम रूपये २,०००/- अक्षरी दोन हजार केवळ अनामत रक्कम भरावी लागेल व त्याची पावती लिलाव अधिका-याकडून मिळेल. अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
३. बोलीची किंमत कमी आहे असे वाटल्यास त्या फांदयाचा फेर लिलाव करण्यात येईल किंवा अपेक्षेप्रमाणे किंमत न आल्यास फांदयाचा लिलाव रद्य करणे इ. अधिकार संबंधित लिलाव अधिका-यास / कमेटीस राहतील. त्याशिवाय लिलाव अधिका-यांचा / कमेटीचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.
४. उच्चत्तम बोली बोलणारासच फांद्या विकल्या जातील.
५. खरेदी करणारांनी खरेदीची रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करून रितसर पावती हस्तगत करणे आवश्यक आहे.
६. रक्कम जमा केल्याशिवाय फांद्या तोडता येणार नाहीत. याची नोंद घ्यावी.
७. खरेदी करणा-या व्यक्तीनेच खरेदी केलेली फांद्या तोडण्याचे काम करावयाचे आहे.
८. शेडच्या ऊंचीपासून अंदाजे ५ फुट जास्त ऊंची ठेवून यापेक्षा जास्त ऊंचीच्या फांदयाचा भाग तोडता येईल.
९. फांदया तोडतेवेळी फांदया मोडून पत्र्याच्या शेडवर पडून शेडचे नुकसान टाळणे आवश्यक आहे. फांदया मोडून पत्र्याच्या शेडवर पडून शेडचे नुकसान झाल्यास संबंधीत खरेदीदारांकडून नुकसान भरपाई भरुन घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. नुकसान भरपाईची रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करुन रितसर पावती हस्तगत करणे आवश्यक आहे. नुकसान भरपाई रक्कम जमा केल्याशिवाय फांदया तोडता येणार नाही याची नोंद घ्यावी.
१०. या कार्यालयाकडून फांदया तोडण्याच्या कामात कसल्याही प्रकारची मदत मिळणार नाही.
११. खरेदी केलेली फांद्या जास्तीत जास्त आठ दिवसांचे आत प्रक्षेत्रासरून न्यावे लागतील. नसता योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.
१२. लिलाव प्रक्रियेसंबधी लिलाव प्रक्रिया समितीच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम ग्राहय धरण्यात येईल. लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-यांनी याची नोंद घ्यावी.

जेष्ठ शास्त्रज्ञ
संकरित गो पैदास प्रकल्प
व.ना.म.कृ.वि.परभणी.

**प्रतिलिपी** : १. मा. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांचे कार्यालयास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संकेत स्थळावर प्रसारणासाठी.

**प्रत** : मा. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यासाठी.